महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४. Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
डॉ. काशिनाथ डी. गर्कळ (पी.एच. डी.)
परीक्षा नियंत्रक
Tel: 0253-2539219, Fax: 0253-2539222/23
Email : coe@muhsnashik.com
Website: www.muhs.ac.in

जा.क्र.:मआविवि/एक्स-सी/५०/००८/६८८८/२०१२

दिनांक: ०2/११/२०१२

Inward No. 202
Date 01/02/2013
Replied / Filed

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य, -4103
सर्व संलग्नित महाविद्यालये,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

विषय : पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे उपस्थिती बाबत...
संदर्भ : दि. २०/१०/२०१२ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाचा ठराव क्र. ७२/२०१२

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या दि.२०/१०/२०१२ रोजीच्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०१२ - १३ या वर्षीपासून आपल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचा (पदवी व पदव्युत्तर) उपस्थितीचा अहवाल दर सहा महिन्यांनी (विषय निहाय तासिका व प्रात्यक्षिकांचे) विद्यापीठास पाठविणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने आपण उचित कार्यवाही करावी.

विहीत नियमानुसार (अधिसूचना क्र.१/२००२ मधील परिच्छेद क्र.३) संपूर्ण अभ्यासक्रमाकरीता व परीक्षेस पात्र ठरविण्यासाठी प्रत्येक विषयाच्या तासिकेची (Theory Period) ७५% उपस्थिती व प्रात्यक्षिकाची (Practical) ८०% उपस्थिती आवश्यक आहे. यापुढे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यापीठास पाठवितांना विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाच्या तासिकांकरीता (Theory Period) कमीतकमी ७०% व प्रात्यक्षिकाची (Practical) ७५% उपस्थिती असल्यास व परीक्षेपर्यंतच्या कालावधीमध्ये कमी पडत असलेली उपस्थितीची भरपाई विद्यार्थी करणार असल्यास व तसे हमीपत्र विद्यार्थ्याने सादर केल्यानंतरच विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यापीठास पाठवावेत. जेणेकरुन उपरोल्लेखित विहीत नियमानुसार उपस्थितीची पुर्तता होईल.

वरीलप्रमाणे विहीत नियमानुसार उपस्थितीची पुर्तता होत नसल्यास संबंधीत विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांचे उपस्थितीबाबत लेखी स्वरुपात कळविण्यात यावेत व सदर पत्राची प्रत विद्यापीठास पाठवावी. वरीलप्रमाणे उपस्थिती अहवाल प्राप्त न झाल्यास व परिक्षेच्या अर्जावर वरीलप्रमाणे आवश्यक उपस्थिती नसलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) विद्यापीठामार्फत देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीस्तव सादर :-
१) मा. कुलगुरु कार्यालय
२) मा. प्रति-कुलगुरु कार्यालय
३) सर्व विद्याशाखा/कक्ष प्रमुख - **संबंधीत** पत्र सर्व महाविद्यालयांना कळविण्यात यावे.